वाचा :- १) म. उपसचिव, महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, मुंबई यांचे कडील शासन आदेश क्रमांक मविसे-१०१७/प्रक्र.३४/२०१७/आस्था-३(अ),दिनांक १४/११/२०१७
२) कार्यालयीन मंजुर टिपणी दि. १६/११/२०१७

**नाशिक जिल्हा परिषद,नाशिक**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**जा.क्र.साप्रवि/आस्था-१/१८७/२०१७**
**नाशिक, दिनांक -१८/ ११ /२०१७**

## आदेश

ज्याअर्थि वाचा क्र. ०१ अन्वये श्री.आर.ए.पगार, सहाय्यक गट विकास अधिकारी, रोहयो, जिल्हा परिषद नाशिक यांची विनंतीनुसार सहाय्यक गट विकास अधिकारी पंचायत समिती सिन्नर जिल्हा परिषद नाशिक येथील श्री. भारत रा. धिवरे,यांच्या बदलीने होणाऱ्या रिक्त पदी करण्यात आलेली आहे. तसेच श्री. भारत रा. धिवरे, सहाय्यक गट विकास अधिकारी, पंचायत समिती सिन्नर, जि.प.नाशिक यांची विनंतीनुसार सहाय्यक गट विकास अधिकारी, रोहयो, जि.प. नाशिक येथील श्री. आर. ए. पगार यांच्या बदलीने होणाऱ्या रिक्त पदी करण्यात आलेली आहे.

त्याअर्थी श्री. आर. ए. पगार, सहा.गट विकास अधिकारी, रोहयो, जि.प. नाशिक व श्री. भारत रा. धिवरे, सहा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती सिन्नर, जिल्हा नाशिक यांना त्यांचे बदली पदस्थापनेचे पदावर हजर होण्यासाठी दिनांक - १८/ ११/ २०१७ रोजी मध्यान्हपुर्व / मध्यान्होत्तर कार्यमुक्त करण्यात येत आहे.

त्याअर्थि श्री. आर. ए. पगार, सहा.गट विकास अधिकारी, रोहयो, जि.प. नाशिक यांनी त्यांचे कडील सहा.गट विकास अधिकारी, रोहयो, जि.प. नाशिक या पदाचा कार्यभार श्री. भारत रा. धिवरे, सहाय्यक गट विकास अधिकारी, यांचेकडेस सुपुर्द करावा. तसेच श्री. भारत रा. धिवरे, सहा.गट विकास अधिकारी, पंचायत समिती सिन्नर जि. नाशिक यांनी त्यांचेकडील सहा.गट विकास अधिकारी, पंचायत समिती सिन्नर या पदाचा कार्यभार श्री. आर. ए.पगार, सहा.गट विकास अधिकारी यांना हस्तांतरीत करावा. कार्यभार हस्तांतरण केल्या बाबतचे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करावे. सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

श्री. आर. ए. पगार, सहा.गट विकास अधिकारी, रोहयो, जि.प. नाशिक व श्री. भारत रा. धिवरे, सहा.गट विकास अधिकारी, पंचायत समिती सिन्नर जि. नाशिक यांनी त्याचे अधिनस्त कार्यरत असणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचे- १८ /११/२०१७ पावेतोचे गोपनीय अहवाल प्रतिवेदीत / पुर्नविलोकन करुन तसेच दि. १८/११/२०१७ ते कार्यमुक्तीच्या दिनांका पावेतोचे गोपनीय अहवाल व अल्प कालावधी प्रमाणपत्र देखिल संबधित आस्थापनेकडे सादर केलेशिवाय अतिंम वेतन प्रमाणपत्र व मुळ सेवापुस्तक पाठविले जाणार नाही.

सदर आदेशाची नोंद श्री. पगार व श्री. धिवरे सहा. गट विकास अधिकारी यांचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी. सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

Deepak 18/11

**(दीपककुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

**प्रति**

श्री. आर. ए. पगार, सहा.गट विकास अधिकारी, रोहयो, जि.प. नाशिक
श्री. भारत रा. धिवरे, सहा.गट विकास अधिकारी, पंचायत समिती सिन्नर जि. नाशिक

प्रत :- माहीतीसाठी सविनय सादर

मा. अवरसचिव, महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग,बांधकाम भवन,२५,मर्झबान पथ, मुबई ०१
मा. विभागीय आयुक्त, विभागीय कार्यालय, नाशिक विभाग,नाशिक.

**प्रत :- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

१.जिल्हा कोषागार अधिकारी,जिल्हा कोषागार कार्यालय नाशिक
२.मुख्य लेखा वित्त अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक
३. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जि.प. नाशिक
४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती सिन्नर जि. नाशिक
५. साप्रवि ज्ञापन नस्ती / रोखपाल.